'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal* | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625, | February-2020
Special Issue 223 : विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक
Peer Reviewed Journal

# जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश

प्रा. माधुरी पं. राखुंडे
इंदिरा महाविद्यालय कळंब जि. यवतमाळ

प्रास्ताविक–

सध्या संज्ञापनातील आमूलाग्र बदलाने जगात मोठया झपाटयाने परिवर्तन घडविले जात आहे. या बदलांमुळेच जगाचे भौगोलिक अर्थशास्त्रही बदलत आहे. दळणवळणाच्या क्षेत्रामध्ये गेल्या काही दशकात जी क्रांती झाली त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला मोठी गती मिळाली आहे. जगामध्ये राष्ट्रे खूप असली तरी प्रत्येक राष्ट्राच्या दृष्टिने जागतिकीकरणाचा अर्थ हा वेगळा आहे. विशेषत: भारतासारख्या देशामध्ये जिथे रोज पन्नास रूपये अथवा त्यापेक्षा कमी रूपये मिळविणारे चाळीस कोटी नागरिक राहतात. ज्यांचे आयुष्य दारिद्रेषेखाली आहे. जे बेरोजगार किंवा अर्धबेरोजगार आहेत, त्या देशाच्या दृष्टिने जागतिकीकरणाचा अर्थ निश्चितच वेगळा आहे. जागतिकीकरणामुळे प्रत्येक देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त व्यापाराची संधी मिळेल. जगभरात जेवढया बहुराष्ट्रीय कंपन्यां आहेत त्यांनी आजघडीला संपूर्ण जगात फक्त ३ कोटीच्या आसपास व्यक्तिंना रोजगार दिला आहे. अनेक देशांनी अत्यंत मेहनतीने अन्नधान्य उत्पादनाच्या बाबत स्वयंपूर्णता प्राप्त केलेली आहे. तीदेखील या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने धोक्यात आली आहे. कारण मुक्त बाजार धोरणामुळे अनेक प्रगत देश जुने किंवा त्याना नकोसे असलेले उत्पादन अत्यंत स्वस्त किंमतीत विकसनशील किंवा अविकसीत अशा देशांमध्ये अक्षरश: ओतून देतात. आधीच गरिबीने ग्रासलेल्या या देशातील जनता स्वस्त असलेल्या या मालाच्या आहारी जाते आणि देशाचे स्वयंपूर्णत्व गमावून बसते. शेतमालाच्या आयात आणि निर्यातीबाबत जे काही नियम झाले आहेत, त्यांचाही अनेकदा मोठया खुबीने आपल्या हितासाठी वापर करण्याची करामत बहुराष्ट्रीय कंपन्या करतात. या पार्श्वभूमीवर आता जागतिक वित्तसंस्था, त्यांचे प्रमुख भांडवलदार आणि बहुराष्ट्रीय कंपन्या या भारतात आणि भारतासारख्या अन्य विकसनशील देशामध्ये कोणती भूमिका बजावत आहे याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. तसेच WTO भूमिका काय आहे याचाही विचार करणे आवश्यक आहे.

१९८० च्या उत्तरार्धात भारतीय अर्थव्यवस्था गंभीर संकटात सापडली होती. हयाचेच लक्षण म्हणजे १९९१ च्या सुरवातीला परकीय चलनाच्या समस्येने उग्र रूप धारण केले होते. परकीय खात्याच्या गंगाजळीत खडखडाट झाला. परकीय कर्जाचे प्रमाण एवढे वाढले होते की ती फेडण्यासाठी भारतीय शासनाला सोन्याचा साठा विक्रीस काढावा लागला. स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये राबविण्यात आलेले आर्थिक धोरण ज्याला नेहरू मॉडेल या नावाने ओळखले जाते त्याची शकले उडाल्याचे स्पष्ट झाले. थोडक्यात अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासासाठी नवीन निती स्विकारण्यांत आली. भारताने १९९१ पासून आयातीवरील निर्बंध कमी करण्यांस सुरूवात केली. १९९६–९७ मध्ये ४८८, १९९७-९८ मध्ये ३८१ व १९९८–९९ मध्ये ८९४ याप्रमाणे १७६३ वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध उठविण्यांत येऊन या वस्तूंची आयात खुली करण्यांत आली. तसेच परकीय भांडवलात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त प्रवेश देण्यात आला. जागतिक व्यापार संघटनेच्या बंधनामुळे भारताला आयात वस्तूवरील परवाना पध्दती व अभ्यांश नियंत्रणे काढून टाकावी लागली. २०००–२००१ च्या निर्यात आयात धोरणानुसार ७१४ बाबींवरील नियंत्रणे हटविली. यामध्ये कृषी व उपभोक्त्यांच्या टिकाऊ वस्तूंचा समावेश होता. २००१–२००२ मध्ये ७१५ वस्तूंवरिल मात्रात्मक नियंत्रणे शिथील केली.

अनेक अविकसित आणि विकसनशिल देशांमध्ये अर्थव्यवस्थेत सरकार हिच सर्वाधिक खर्च करणारी आर्थिक व्यवहार करणारी यंत्रणा असते. अशा देशाच्या अर्थव्यवस्थेवर जागतिक व्यापार संघटनेचे नियंत्रण असते आपोआप स्थापीत होते. एकदा शासकिय आर्थिक व्यवहारावर जरी नियंत्रण स्थापित केले गेले, तरी त्या जागतिक व्यापार संघटनेला त्या देशातील संपूर्ण आर्थिक व्यवहारांवर रोक्ष–परोक्षरित्या आपले वर्चस्व निर्माण करता येते. त्याद्वारे त्या देशात आपल्याला हवी तशी धोरणे राबविता येतात. किंवा बदलून घेता येतात. हे टाळण्यासाठी अनेक विकसनशिल देशांनी याबाबत जागतिक व्यापार संघटनेचे जे काही नियम होते त्याला विरोध केला होता. हा विरोध खूप तिव्र झाल्यावर विकसनशिल राष्ट्रांनी तो मवाळ करण्यासाठी पारदर्शकतेचे तत्व मांडले आणि विकसित आणि विकसनशिल अशा देशांतील सरकारकडून आणि सार्वजनिक क्षेत्राकडून जे आर्थिक व्यवहार होतील त्यात जास्तीत जास्त पारदर्शकता राखली जावी यासाठी द्विस्तरीय अशी एक योजना तयार केली. व ती मुळ कराराच्या मसुद्याला जोडण्यांत आली. या योजनेच्या पहील्या टप्यांत अशा देशांतील सरकारकडून अथवा शासकिय संस्थांकडून जागतिक व्यापार संघटनेशी जे करार मदार होतील ते जास्तीत जास्त पारदर्शक असावेत, हे साध्य ठरविण्यांत आले होते.

एप्रिल १९९४ मध्ये गॅटच्या सदस्य राष्ट्रांनी मोरोक्कोमधील मर्राकेश या ठिकाणी एक करार मान्य केला. या मर्राकेश कराराद्वारे गॅटच्या जागी एक नवी संघटना, जागतिक व्यापार संघटना WTO स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार १ जानेवारी १९९५ रोजी ँ्च स्थापना करण्यात आली.

**WTO ची उद्दिष्टे –**

- सदस्य राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे.
- रोजगारात वाढ घडवून आणणे.
- वस्तूंचे उत्पादन आणि व्यापार वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
- जागतिक संसाधनाचा पर्याप्त वापर होईल असे पाहणे.
- पर्यावरण संवर्धन करणे.
- सर्व देशाचा विकास करणे.

ही सर्व उद्दिष्टे रास्त स्वरूपाची व आकर्षक आहेत तसेच ती पूर्ण करण्यासाठी सर्व देशांनी एकमेकांना समान दर्जा व वागणूक दिली पाहिजे.

**जागतिक व्यापार संघटना आणि भारत –**

जागतिक व्यापार संघटनेमुळे व्यापार निर्बंध हटविले गेले. व्यापारात पारदर्शकता आली. बौध्दिक संपदा अधिकाराच्या संरक्षणामुळे संशोधनाला प्रोत्साहन मिळाले. जागतिकीकरणाला या कारणांनी गती आली. असे असले तरी जागतिक व्यापार संघटनेचे वीस वर्षापूर्वीचे महत्व आज राहिले नाही हे वास्तव आहे.

१९९०–९१ या वर्षापासून देशात उदारीकरणाचे वारे जोरात वाहू लागले होते पण त्यापूर्वीच जागतिक स्तरावर जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली होती. त्याचे व्यासपीठ होते गॅट करार. पहिल्या महायुध्दानंतर बहुतेक सर्व देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडल्या होत्या. देशादेशातील व्यापारांवर प्रचंड निर्बंध लावण्यात आले होते त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार फार कमी झाला होता. जगात मंदी आली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी १९४४ मध्ये ब्रेटन वुड्स येथे एक परिषद झाली आणि त्याचे फलित म्हणून २३ देशांनी १९४७ मध्ये गॅट करार ( General Agreement on Tariff and Trade) केला. आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत व्हावा व देशांना

आयात–निर्यातीवरील बंधने कमी करावीत म्हणजे व्यापारमुक्त होऊन सर्वच देशांना फायदा होईल, असा या कराराचा उद्देश होता. हा करार मुख्यतो आयात शुल्क कमी करण्याचा करार होता. पहिल्या करारात सुमारे ४५ हजार वस्तूंवरील आयात शुल्कात कपात करण्यात आली. व्यापारवृध्दीसाठी करार उपयोगी असल्याचे लक्षात आल्याने हे व्यासपीठ सुरू राहिले. १९४७ नंतर १९७३ पर्यंत झालेल्या सातही करारांत वस्तू व्यापार आणि त्यावरील आयात शुल्क कमी करणे याशिवाय कोणताही विषय नव्हता. १९७३ ते १९८६ या काळात चर्चा झाली नाही. चर्चेची आठवी फेरी १९८६ मध्ये उरूग्वेमध्ये सुरू झाली.

गॅट करार आणि जागतिक व्यापार संघटना–

गॅट करार चर्चेच्या आठव्या फेरीत प्रथमच वस्तू व्यापार व आयात शुल्क या व्यतिरिक्त शेती (अन्नधान्य, फुले, फळे, सागरी अन्न, भाज्या, मांस इ.) सेवा (बँकिंग, विमा, शिक्षण, तंत्रज्ञान, दळणवळण, बांधकाम, वितरण, पर्यटन, आरोग्य, सांस्कृतिक विषय, खेळ इ.), गुंतवणूक (एका देशातून दुसऱ्या देशात होणारी अल्प व मध्यम व दिर्घ मुदतीची, मालकीची आणि कर्जाऊ गुंतवणूक ) आणि बौध्दिक संपदा अधिकार (पेटंट्स, कॉपीराईट्स, भौगोलिक विशेषता, इंटीग्रेटेड सर्किटस, औद्योगिक संकल्पचित्र आणि गोपनिय माहिती इ. )या चार नविन विषयांचा समावेश करण्यात आला. या चार बाबींमुळे जागतिक व्यापारास गती मिळेल असा दावा करण्यात आला. या चारही विषयांना 'व्यापार विषयक' किंवा 'व्यापारासंबंधी' अशी विशेषणे लावून ते विषय गॅट करारात आणल्या गेले. गॅट कराराच्या या विस्तारीत कक्षेला संलग्न सभासद देशांची सहजासहजी मान्यता मिळाली नाही. १९८६ मध्ये सुरू झालेली चर्चा १९९१ पर्यंत चालली. १९९१ मध्ये 'डंकेल ड्राफ्टवर भरपूर चर्चा चालली आणि अखेरीस मोरोक्कोच्या मारकेश येथील परिषदेत १५ एप्रिल १९९४ रोजी १२५ देशांनी या करारावर सहया करून जागतिक व्यापार संघटना या ऐतिहासिक संस्थेची स्थापना केली.

जागतिक व्यापार संघटनेचा हेतू –

प्रत्येक देश त्यातील सरकार हे त्यांची स्वत:ची अर्थव्यवस्था घडवू शकते. ती विकसित करू शकते या आजवरच्या सत्यावरच जागतिक व्यापार संघटनेने घाला घातला आहे. अशा मार्मिक शब्दांत द वॉलस्ट्रीट जर्नलने जागतिकीकरणाचे वर्णन केले आहे. जागतिक बँकेचे जेष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डेल यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांची निर्मिती ही विविध देश, राज्ये यांचे आर्थिक हितसंबंध, गरजा पूर्ण करण्यासाठी झाली होती. परंतु संपूर्ण जगात एकच अर्थव्यवस्था अस्तित्वात आणणे संपूर्ण जगातील नागरिकांना विश्वाचा नागरिक म्हणून सेवा देणे हे तिचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जागतिक व्यापार संघटना साकारली आहे.

जागतिक व्यापार संघटनेचे मुक्त धोरण–

जागतिक व्यापार संघटनेच्या कारभाराचा आणि गॅटचा जो फटका अनेक आफ्रिकन आणि लॅटिन अमेरिकन राष्ट्रांना बसला , तसाच फटका भारतालाही बसला आहे. एकीकडे विदेशी कंपन्यांच्या आगमनामुळे होणारी स्पर्धा व दुसरीकडे ज्या कंपन्या देशात आल्या नाहीत, परंतु त्यांचा अन्य देशात न खपनारा माल आणून टाकताहेत बेरोजगारी, अर्थव्यवस्था कुंठीत होणे अशा समस्या भारतातही निर्माण होऊ लागल्या आहेत. एकप्रकारे निऔद्योगिकरणाची प्रक्रिया यामुळे अनेक अविकसित आणि विकसनशिल देशात सुरू झाली आहे. असे चित्र निर्माण झाले आहे.

यावाबतचे करार पर्यावरण आणि सामाजिक

जागतिक व्यापार संघटनेने व्यापार आणि व्यवसाय यावाबतचे करार पर्यावरण आणि सामाजिक यांच्याशी निगडित केले आहेत, याचाही फटका अनेक गरिब देशांना बसतो आहे. ज्या देशात बाल वेठबिगारी, शोषण यासारख्या समस्या आहेत त्या देशातील माल कितीही चांगला असला तरी तो करायचा नाही. ज्या देशात पर्यावरणात्मक समस्या आहेत, मग त्याचा परिणाम त्या देशाने आंतरराष्ट्रीय आणलेल्या मालावर झालेला असो अथवा नसो, तो खरेदी करावयाचा नाही अशा स्वरूपाची एक संरक्षक यंत्रणा विकसित देशांनी त्यांच्या देशातील उत्पादने व सेवा यांची बाजारपेठ यांचे रक्षण करण्या निर्माण केल्याचे जाणवते. वरपांगी असे जाणवते की, सामाजिक आणि पर्यावरणात्मक बाबी या व्यवसायाशी जोडण्यामागे जागतिक व्यापार संघटनेचा हेतू हा सामाजिक सुरक्षा घडवून आणणे व पर्यावरणाचे रक्षण करणे हा आहे. परंतु वस्तुत: या तरतुदींचा हेतू सामाजिक समस्या दूर करणे अथवा पर्यावरणाचे करणे हा नसून त्या सबबीखाली अविकसित व विकसनशील अशा देशातील जागतिक दर्जाची जी आणि सेवा आंतरराष्ट्रीय बाजारात विक्रीसाठी येऊ शकतात, त्यांची स्पर्धा, क्षमता घटविणे हा आहे. आहे. सामाजिक व पर्यावरणात्मक बाबींचा संबंध व्यापाराशी जोडून बडया राष्ट्रांनी या एकाच आपल्या सेवा व वस्तूंच्या उत्पादनांना संरक्षण प्राप्त करून देणे आणि गरीब राष्ट्रांच्या उच्च दर्जाचे आणि सेवांना बाजारपेठेपासून दूर ठेवणे, अशी दोन्ही उद्दिष्टे साध्य केली आहेत. कोणतेही जागतिक उत्पादन, त्याच्या निर्मितीप्रक्रियेत बालमजुरांचा वापर होतो त्याच्या निर्मितीत वेठबिगाराचे श्रम असतात जागतिक दर्जाच्या कृषी उत्पादनात त्यासाठी वापरलेले पाणी प्रदूषित होते, ज्या हवामानात ते वाढले ते होते, अशाप्रकारचे दावे विकसित राष्ट्रे करू शकतात आणि गरिब राष्ट्रांची ही उत्पादने आपल्या बाजारात येण्यापासून रोखू शकतात. एकीकडे मुक्त जागतिक व्यापाराचा व अर्थकारणाचा पुरस्कार करावयाचा दुसरीकडे अशा स्वरूपाचे निर्बंध निर्माण करावयाचे हा शुध्द दुटप्पीपणा आहे.

जागतिक व्यापार संघटनेने तयार केलेले करारमदार, त्यांना जगभरातून मिळणारा प्रतिसाद, अमेरिकेच्या हितसंबंधावर होणारा परिणाम यावर लक्ष ठेवण्यासाठी त्याचे विश्लेषण करून त्याचा सतत घेण्यासाठी अमेरिकेत १५०० अधिकारी व तेवढेच संगणक कार्यरत असतात. तर भारत सरकारचे फक्त अधिकारी जागतिक व्यापार संघटनेशी संबंधित कामकाज करण्यासाठी नियुक्त केले जाते. ही एकच जागतिक व्यापार संघनटनेतील भेदाभेद स्पष्ट करणारी आहे. जागतिक व्यापार संघटनेवर बडया राष्ट्रांचे वर्चस्व आणि त्याचा व त्या संघटनेचा भारतीय अर्थव्यवस्थेवर, जनतेच्या हितसंबंधात होणारा परिणाम घेऊन भारत सरकारने अधिक मनुष्यबळ आणि तंत्रबळ त्यासाठी वापरणे आवश्यक आहे. जर या बाबीकडे दिले गेले नाही तर त्याचा परिणाम अविकसित आणि विकसनशील अशा देशांची जागतिक व्यापार संघटने भावी वाटाघाटीतील सौदाशक्ती कमी होण्यात घडू शकतो. तसेच त्यांची स्पर्धा क्षमता घटण्यात होऊ शकते त्यामुळे त्यांच्यावर जागतिक व्यापार संघटनेच्या एकूण व्यापारात अन्याय होण्यचीही शक्यता निर्माण शकते.

मुल्यमापन–

१९९१ मध्ये भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने घालून दिलेल्या अटी आणि शर्तीचा स्विकार त्यापाठोपाठ जागतिक व्यापार संघटनेच्या उरूग्वे येथील चर्चेमध्ये ज्या जाचक अटी आणि शर्ती लादल्या त्याचाही स्विकार केला त्यामुळे अमेरिकेच्या वर्चस्वाखाली असलेल्या आणि पॅरिस व लंडन मुख्यालयातून आपली सुत्रे हलविणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक व्यापार संघटना यांच्या

बाहुले बनण्याची पाळी भारतावर ओढवली. या संघटनेत त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कोणत्याही संघटनेत भारतीय वंशाचे परंतु भारताबद्दल काडीचेही ममत्व नसलेले असे तीन ते चार अधिकारी त्यामध्ये असतात आणि त्यांच्याच माध्यमातून या संस्था आपली भारतविरोधी आणि साम्राज्यवादी धोरणे राबवित असतात. या अधिकाऱ्यांचे लागेबांधे भारतातील अर्थकारण आणि प्रशासन यांची सुत्रे हलविणाऱ्या भारतीय सनदी अधिकाऱ्यांशी जोडले गेले असतात आणि त्यांच्या जोरावर हे विदेशी संस्थांतील मुठभर अनिवासी भारतीय किंवा केवळ वंशाने भारतीय असलेले भारतीय भारतातील कोणत्याही यंत्रणेकडून त्यांना हव्या त्या गोष्टी घडवून आणित असतात. उदा. आजपर्यंत भारतीय रिझर्व्ह बँकेवर केंद्र सरकारचे नियंत्रण होते त्यामुळे ही बँक केंद्र सरकार सांगेल त्या सूचना आणि आदेशानुसार कार्यरत होती, परंतु आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची बंधने स्विकारल्यामुळे आता रिझर्व्ह बँक ही केंद्र सरकारच्या यंत्रणातून जवळजवळ मुक्तच झाली आहे. त्यामुळे गरज लागेल तेव्हा यापूर्वी केंद्र सरकार रिझर्व्ह बँकेला चलन छापण्याचा आदेश देत असे व ती रिझर्व्ह बँक अमलात आणीत असे. आपल्याला जेवढया निधीची आवश्यकता आहे तेवढया रकमेचे कर्ज बाजारातून उभारण्याचा आदेश रिझर्व्ह बँकेला केंद्र सरकार देत असे व त्याचे पालन रिझर्व्ह बँक करित असे परंतु आता रिझर्व्ह बँकेने किती चलन छापावे आणि बाजारातून किती मर्यादेपर्यंत उभारणी केंद्र सरकारसाठी करावी यावरच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने निर्बंध घातले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली चालणारी यंत्रणा म्हणून रिझर्व्ह बँकेचे जे स्थान होते ते आता संपुष्टात आले आहे. केंद्राने दिलेला आदेश अथवा सूचना हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक व्यापार संघटना यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आणि अटी शर्तीच्या मर्यादेत बसत असला तरच रिझर्व्ह बँक त्याचे पालन करणार अशी स्थिती आता निर्माण झाली आहे. रिझर्व्ह बँकेचेच नव्हे तर आपल्या केंद्र सरकारचेही सध्याा जागतिक व्यापार संघटना आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या अटी स्वीकारल्यामुळे अक्षरश: बाहुले झाले आहे. अर्थसंकल्पीय तूट किती असावी, महसूल तूट किती असावी, वित्तीय तूट किती असावी तिचे राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नाशी किती व कसे गुणोत्तर असावे या सगळयाबाबतचे निर्बंध केंद्रावर जागतिक व्यापार संघटना आणि नाणेनिधी यांनी लादले आहेत. या संघटना केवळ हे निर्बंध लादूनच थांबलेले नाहीत, तर त्यांनी त्यांच्याकडून भारताला जे सहाय्य, कर्ज अथवा सवलती दिल्या जाणार असतील त्या प्रत्यक्षात देणे भारत हे निर्बंध कशाप्रकारे अमलामध्ये आणतो याच्याशी निगडित करून ठेवले आहे.यालाच त्यांनी आर्थिक सुधारणा किंवा आर्थिक पुनर्रचना, असे गोंडस नांव दिले आहे. त्यामुळे अशा संघटनांकडून जेव्हा जेव्हा कधी अर्थसहाय्य, कर्ज, सवलती मिळण्याची भारतावर वेळ येईल त्या–त्या वेळी भारताला या संघटनांनी लादलेल्या अटी शर्ती आपण कशा शंभर टक्के अमलात आणल्या आहेत हे सिध्द करून दाखवावे लागेल. एवढयावरच भागणार नाही तर तशी या दोन्ही संघटनांची खात्री पटावी लागेल त्यानंतरच ते भारताला जे काही द्यावयाचे आहे ते देतील. भारत सरकारच्या आर्थिक धोरणाला वेसन घालण्याचे कार्य या संघटना करताहेत असेच म्हणावे लागेल.

जागतिक व्यापार संघटनेचे स्वरूप हे मूलत: हे बहुविध व्यापार करारासारखे आहेत. जागतिक व्यापार वाढीस या संघटनेचा हातभार लावला आहे हेही तेवढेच खरे आहे कारण पूर्ण रोजगार निर्माण करण्यास श्यश आले नसले तरी एखादया देशाला हे उद्दिष्ट गाठणे सोपेही नाही. हेही तेवढेच खरे आहे. गरीब आणि अविकसीत राष्ट्रांनी आपली अर्थव्यवस्था बळकट केली व स्वत:च्या देशात सर्वांना किमान गरजा पूर्ण करता येईल अशी व्यवस्था निर्माण केली. समानता, न्याय, बंधूता या तत्वांवर समाजाची उभारणी केल्यास कोणतीच

ISSN : 2348-7143
February-20

संघटना, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सत्ता अशा देशांचे अहित करू शकणार नाही, हेही तेवढेच खरे आहे पण त्यासाठी स्वतःची शक्ती वाढविणे आवश्यक आहे.

संदर्भ–

1. जागतिकीकरण नवी गुलामगिरी – अॅडमिरल विष्णू भागवत
2. जागतिकीकरण की नवी गुलामगिरी?–नीरज जैन
3. दैनिक वृत्तपत्र